दैनिक
रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...
# लक्ष महाराष्ट्र
नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगाव येथून एकाचवेळी प्रकाशित.
RNI No.MAHMAR/2019/79184
www.lakshamaharashtra.com | lakshamaha.dhule@gmail.com | lakshamaha.nsk@gmail.com
धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती | वर्ष ४ थे | अंक : २६२ वा | मंगळवार दि. १८ जुलै २०२३ | किंमत : २ रु. | पृष्ठे : ६

## विधिमंडळाचे कामकाज दिवसभरासाठी स्थगित



**मुंबई ।** विरोधकांनी सभात्याग केल्यानंतर विधानसभेत शोकप्रस्ताव मांडण्यात आला. त्या नंतर विधानसभा स्थगित करण्यात आली. दरम्यान, विधानसभेचे कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आले होते. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार यांच्यासह राष्ट्रवादीच्या नेत्यांनी सरकारला पाठिंबा देत मंत्रिपदाची शपथ घेतल्यानंतर पहिलेच अधिवेशन कालपासून सुरू झाले. मात्र, राष्ट्रवादीमध्ये पडलेल्या उभ्या फूटीनंतर महाविकास आघाडीची बाजू कमकुवत झाली आहे.

## न्यूज कॉलम

### शेती वाटणीच्या वादातून हाणामारी

**धुळे ।** शेती वाटणीच्या वादातून तालुक्यातील सावळी गावात हाणामारी झाली. याप्रकरणी परस्परविरोधी तक्रारीवरून आठ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर परस्परविरोधात गोरख हिरामण मराठे यांनी फिर्याद दिली आहे. त्यानुसार, शेती वाटणीच्या कारणावरून निलेश संजय जगताप, साहेबराव लक्ष्मण मराठे, सचिन संजय जगताप, राकेश संजय जगताप सर्व (रा.चिंचखेडा) यांनी मारहाण करीत जीवे ठार मारण्याची धमकी दिली. यात सचिन जगताप याने लोखंडी सळईने डोक्यावर वार केला. तसेच पुतण्या अविनाश याला मारहाण करून जखमी केले.

### आर्थिक वादातून तरुणाला मारहाण

**धुळे ।** कोकले (ता. साक्री) गावात आर्थिक वादातून जेसीबीचालक तरुणाला मारहाण झाल्याची घटना घडली. गणेश निवृत्ती पवार (रा. कोकले) असे मारहाणीत जखमी झालेल्या तरुणाचे नाव आहे. त्याच्या फिर्यादीनुसार बांधकामाच्या खडीचे पैसे मागितल्याच्या कारणावरून अरुण रामा वाघ (रा. घोड्यामाळ पिंपळनेर, ता. साक्री) याने लाकडी दांडक्याने मारहाण केल्याचे तसेच जीवे मारण्याची धमकी दिल्याचे म्हटले आहे.

# भाजपसोबत जायचा प्रश्नच नाही, लोक येऊन भेटले तरी भूमिकेत बदल नाही : शरद पवार

**मुंबई । प्रतिनिधी**

अजित पवार आणि समर्थक आमदारांनी पुन्हा एकदा शरद पवार यांची अचानक भेट घेतली. या भेटीनंतर राजकीय चर्चेला उधाण आले. पण शरद पवार यांनी आपली भूमिका स्पष्ट केली आहे. सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, शरद पवार यांनी भाजपसोबत जाण्यास नकार दिला आहे. अजित पवार आणि समर्थक आमदार शरद पवार यांची मनधरणी करण्यासाठी आज पुन्हा वायबी चव्हाण सेंटर येथे गेले होते. त्यानंतर शरद पवार यांनी आपली भूमिका स्पष्ट केली.

भाजपसोबत जायचा प्रश्नच उद्भवत नाही, अशी भूमिका शरद पवार यांनी घेतली आहे. लोक येऊन भेटले तरी भूमिकेत बदल होणार नाही, अशी भूमिका शरद पवार यांनी अजितदादा गटाकडे मांडल्याची माहिती मिळाली आहे. अजित पवार आणि समर्थक आमदार सरकारमध्ये सामील झाले. त्यानंतर ते दुसऱ्यांदा शरद पवार यांची भेट घेण्यासाठी आले होते. त्यावेळी त्यांनी शरद पवार यांची मनधरणी करण्याचा प्रयत्न केला. पण शरद पवार यांनी कोणताही प्रतिक्रिया दिली नाही.

राष्ट्रवादी काँग्रेसचे बंडखोर आमदारांनी सोमवारी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वात पक्षाध्यक्ष शरद पवार यांची येथील यशवंतराव चव्हाण सेंटरमध्ये भेट घेतली. अजित पवार यांच्यासह छगन भुजबळ, दिलीप वळसे पाटील, हसन मुश्रीफ आदी मंत्र्यांनी रविवारीच पवारांची भेट घेतली होती. त्यानंतर सलग दुसऱ्या दिवशी अजित पवारांच्या गोटातील आमदारांनी पवारांची भेट घेतली.

यासंबंधीच्या वृत्तानुसार, विधिमंडळाचे कामकाज संपल्यानंतर अजित पवार व त्यांचे आमदार यशवंतराव चव्हाण सेंटरवर पोहोचले. तेव्हा शरद पवार सिल्व्हर ओक या आपल्या निवासस्थानी होते. तेथून ते थेट वाय बी सेंटरमध्ये पोहोचले. तिथे त्यांनी अजित पवार व त्यांच्या समर्थकांशी संवाद साधला. जवळपास तासभर हा संवाद सुरू होता. विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन, राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांनी एकमेकांना बजावलेले व्हीप तथा विरोधी पक्षांच्या बंगळुरूतील बैठकीच्या पार्श्वभूमीवर या भेटीगाठी होत असल्यामुळे राज्याच्या राजकारणात मोठी खळबळ माजली आहे.



### अजित पवार गट शरद पवारांच्या भेटीला, राष्ट्रवादीचे कार्यकर्ते संभ्रमात

**उपमुख्यमंत्री अजित पवार गटाकडून शरद पवारांना साकडं घालणं सुरू झालंय. त्यामुळे राज्यातील पदाधिकारी आणि कार्यकर्ते संभ्रमात पडलेत. अजित पवारांना समर्थन देण्यासाठी कार्यकर्ते शंभर रुपयांच्या बॉण्डवर लिहून देतायेत. दुसरीकडे मात्र वेगळ्याच घडामोडी घडत असल्यानं कार्यकर्ते ही बुचकळ्यात पडलेत. पण पवार कुटुंब एकत्र आलं तर आमच्यावरही अशी वेळ येणार नाही, असं ते म्हणतायेत.**

### शरद पवार यांच्या भेटीला कोणते नेते गेले?

**अजित पवार, प्रफुल पटेल, सुनिल तटकरे, अनिकेत तटकरे, विक्रम काळे, अतुल बेनके, अमोल मिटकरी, सुनील टिंगरे, सुनील शेळके, दत्तामामा भरणे, संजय शिंदे, अण्णा बनसोडे, संजय बनसोडे, इंद्रनील नाईक, सरोज अहिरे, राजु कारेमोरे या नेत्यांनी शरद पवार यांची वायबी सेंटर येथे जाऊन भेट घेतली.**

### त्यांच्या मनात काय,माहित नाही : पटेल

**शरद पवार यांची भेट घेतल्यानंतर प्रफुल पटेल यांनी प्रसारमाध्यमांशी सवाद साधला. शरद पवार यांच्याशी बातचीत झाली. राष्ट्रवादी एकत्रच ठेवण्याचा प्रस्ताव दिला. पण त्यांनी त्यावर काहीच प्रतिक्रिया दिली नाही. त्यांच्या मनात काय सुरु आहे... हे माहित नाही, असे प्रफुल पटेल म्हणाले.**

### पवार, अजित पवार, पटेलांत बैठक

**वाय बी सेंटरवर शरद पवार यांची अजित पवार व प्रफुल्ल पटेल यांची बैठक झाली. त्यात बंडखोर गटाने शरद पवारांची सोबत येण्यासाठी समजूत काढली. या ठिकाणी जयंत पाटील, जितेंद्र आव्हाड व रोहित पवारही उपस्थित होते. पण त्यांना या बैठकीपासून दूर ठेवण्यात आले. अजित पवार गट शरद पवारांची भेट घेतोय, यामध्ये वेगळं काही वाटायचं कारण नाही. शरद पवारांनी आपली भूमिका गट फुटल्यानंतर दोन ते तीन वेळेस स्पष्ट केली आहे.**

### ..तर शरद पवारांचे स्वागतच करु : केसरकर

**नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाला सगळेजण मानतात. नरेंद्र मोदी हे शरद पवारांना राजकीय गुरू मानतात, असं त्यांनी म्हटलं होतं. जर अजित पवार गट शरद पवारांचं मन वळवण्यात यशस्वी झाला तर आम्हाला आनंदच होईल, अशी प्रतिक्रिया दीपक केसरकर यांनी दिली. शरद पवारांचा अनुभव याची मदत आम्हाला सर्वांनाच होईल. आता शरद पवार आपला निर्णय बदलतील का? हे मी नाही सांगू शकत पण आमची पण अपेक्षा आहे की, त्यांनी जर बदलला तर त्याचे स्वागतच करू, असेही केसरकर म्हणाले.**

# मार्कंडेय पर्वतावर दरड कोसळली; दोघे गंभीर जखमी

**नाशिक । प्रतिनिधी**

येथील सप्तशृंगी गडालगत असलेल्या मार्कंडेय पर्वतावर सोमवती अमावस्यानिमित्त भाविकांची मोठ्या प्रमाणावर गर्दी झाल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. अशातच पायवाटेचा मार्ग काढत पर्वतावर चढणाऱ्या दोन भाविकांवर दरड कोसळल्याने दोघेही गंभीर जखमी झाल्याची दुर्घटना घडली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, मार्कंडेय पर्वतावर दरवर्षी सोमवती अमावस्यानिमित्त यात्रा भरते. या यात्रेसाठी जिल्ह्यासह विविध राज्यांतून हजारो भाविक दर्शनासाठी येत असतात. त्यातच आज सोमवती अमावस्या असल्याने मार्कंडेय पर्वतावर भाविकांनी मोठी गर्दी केली होती. यावेळी सकाळी ११ वाजेच्या सुमारास बाबापूर-मुळाणे बारी मार्गे मार्कंडेय पर्वतावर जाण्यासाठी असलेल्या पायवाट



मार्गावर पर्वताची चढाई करणाऱ्या दोन भाविकांवर एक १०० किलो वजनाचा दगड निखळून खाली येऊन अंगावर आल्याने बाळु गजराम चारोस्कर (वय ५७) रा. दिंडोरी तळेगाव ता. दिंडोरी आणि अशोक मनोहर गायकवाड (वय ५५) रा. बोरगड म्हसरुळ नाशिक हे दोघे गंभीर जखमी झाले. दरम्यान, या घटनेनंतर तात्काळ दोन्ही जखमींना उपचारासाठी १०८ रुग्णवाहिकेतून वणी येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्याठिकाणी प्राथमिक उपचार केल्यानंतर त्यांना पुढील उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात पाठविण्यात आले आहे.

## मिनाबाई भगवान करनकाळ यांचे निधन



**धुळे ।** मनपा चे प्रथम महापौर भगवानबापुजी करनकाळ यांच्या धर्मपत्नी, नंदुरबार च्या माहेरवाशीण- मिनाबाई भगवान करनकाळ यांचे, दि. १७ रोजी, अल्पशा आजाराने, निधन झाले. एक वर्षांपासून, आजाराने त्या त्रस्त होत्या. मागील आठ महिन्यांपासून, त्यांच्यावर- हैदराबाद येथे आणि अपोलो हॉस्पिटल येथे, उपचार सुरू होते. उपचारादरम्यान भगवानबापुजी करनकाळ सातत्याने त्यांच्या सोबतच होते. बापुजींनी, त्यांना या आजारातून, बाहेर काढण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले. परंतु, त्यांच्या आणि डॉक्टरांच्या शर्तीच्या प्रयत्नांना यश आले नाही. शेवटी क्रूर काळाने, घात केला, अन् सौ.मिनाबाई करनकाळ यांची प्राणज्योत मालवली. त्यांची अंत्ययात्रा, आज सकाळी १०:०० वाजता, वृंदावन अपार्टमेंट, डॉलीज हाऊस जवळ, न्हावी कॉलनी, देवपुर धुळे येथुन निघणार आहे.


## मोबाईल दुकानावर चोरट्यांचा डल्ला

### एका महिन्यात तिसरी घटना

**धुळे । प्रतिनिधी**

शिंदखेडा तालुक्यातील चिमठाणे येथील बसस्थानक परिसरातील तेजश्री मोबाईल दुकान शनिवारी (ता.१५) मध्य रात्री चोरट्यांनी रोख २५ हजार रुपये रोख, मोबाईल व मोबाईल टॅब असे एकूण ६१ हजार ३०० रुपयांच्या वस्तूवर डल्ला मारला. योगेश्वर राजेंद्रसिंह गिरासे (वय ३३, रा. दलवाडे, प. सोनगीर) यांचे चिमठाणे बसस्थानक परिसरात तेजश्री मोबाईल दुकान आहे. शनिवारी रात्री आठच्या सुमारास दुकान बंद करून घरी निघून गेला होता.

शेजारी दुकानदार शाना धनगर याने रविवारी (ता.१६) फोन केला, की तुमच्या दुकानाचे शटर तोडून चोरी झाली आहे. दुकानातील सीसीटीव्ही कॅमेऱ्याची चोरट्यांनी तोडफोड करुन नुकसान केल्याचे दिसले. तसेच दुकानाच्या काऊंटरच्या गल्ल्यात ठेवलेले रोख २५ हजार रुपये, मोबाईल ॲसेसरीज, इतर किरकोळ मोबाईल ॲसेसरीज, टॅब असे एकूण ६१ हजार ३०० रुपये किमतीच्या वस्तू चोरट्यांनी लांबविल्या. रविवारी सायंकाळी शिंदखेडा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहाय्यक निरिक्षक प्रशांत गोरावडे यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार सदेंसिंग चव्हाण तपास करीत आहेत. रविवारी दुपारी शिरपूर उपविभागीय पोलिस उपअधीक्षक सचिन हिरे, सहाय्यक निरिक्षक प्रशांत गोरावडे, धुळे स्थानिक



गुन्हा अन्वेषण विभागाचे उपनिरीक्षक प्रकाश पाटील , हवालदार सदेंसिंग चव्हाण, शव्नपथक व ठसे तज्ञ यांनी ठसे घेतले आहेत. शव्न ' प्रिन्स ' याने दोंडाईचा राज्य महामार्गा लगत पाटचारी पर्यंत चोरट्यांचा माग दाखविला असून तेथून चोरट्यांनी वाहन वापरले असा कयास पोलिसांनी व्यक्त केला. शिंदखेडा पोलीस ठाणे हद्दीत एकूण ६९ गावांचा समावेश असून चिमठाणे पोलिस दुरक्षेत्र अंतर्गत ३३ गावांचा समावेश आहे. पोलिस ठाण्याचे निरिक्षक सुनिल भाबड यांची बदली झाल्याने चिमठाणे दुरक्षेत्राचे सहाय्यक निरिक्षक प्रशांत गोरावडे यांच्या कडे शिंदखेडा पोलिस ठाण्याचा प्रभारी म्हणून अतिरिक्त कार्यभार असल्याने येथे फक्त एक हवालदार, एक पोलिस नाईक व दोन पोलिस कर्मचारी कार्यरत आहेत. येथे पोलिस कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात यावी अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

## नंदुरबार-दोंडाईचा रस्त्यावर भीषण अपघात ; एक ठार

### तीन गंभीर जखमी

**दोंडाईचा । प्रतिनिधी**

नंदुरबार रस्त्यावर शिंदखेडा तालुक्यातील धावडे गावापासून दोन किमी अंतरावर पोल्ट्री फार्म जवळ दुचाकी व मालवाहू पीकअपची समोरासमोर धडक झाली. या अपघातात एक जण जागीच ठार झाला असून तीन जण जखमी झाले घटनास्थळी रुग्णवाहिका वेळेवर न आल्याने मृत व्यक्ती व जखमी अर्धा तास रस्त्यावर पडून होते.

शिंदखेडा तालुक्यातील धावडे गावाजवळ दोन किलोमीटर अंतरावर पोल्ट्री फार्मच्या समोर नंदुरबार कडून येणारी मालवाहू पिकअप ( क्र. एम एच १५, जी व्ही ४३३६) ही पुढे चालत असलेल्या ४०७ मालवाहू गाडीला ओव्हरटेक करण्याच्या नादात पिकअपने समोरून येणाऱ्या ट्रकच्या मागे असलेल्या दुचाकीला ओव्हरटेक करण्याच्या नादात मोटरसायकलला जोरदार धडक दिली, असून त्यात मोटर सायकल स्वार देवनाथ अमृत सपकाळे (वय ४५) जागीच ठार झाला व मोटारसायकल स्वार पत्नी वंदना देवनाथ सपकाळे, मोठी मुलगी परशनी दिगंबर अहिरे, लहान मुलगी गीता देवनाथ सपकाळे गंभीर जखमी झाले असून या तिघे माय लेकिंना पुढील उपचारासाठी जिल्हा रूग्णालयात हलविण्यात आले. घटनेची माहिती मिळताच घटना स्थळी पोलीस उपनिरीक्षक शरद लेंडे, प्रकाश पावरा, निलेश धनगर, नरेंद्र शिरसाठ उपस्थीत होते. देवनाथ सपकाळे हा मातंग समाजाचा असून तो गावातील मौतीच्या ठिकाणी डफ वाजण्याचे काम करत होता. वृद्ध आई वडील समोर घटना पाहून हंबरडा फोडला.

## दोन वर्षांपासून कोट्यावधी रुपयांची देयके रखडली, शासकीय कंत्राटदारांचे लाक्षणिक साखळी उपोषण

**धुळे । प्रतिनिधी**

गेल्या दोन वर्षांपासून कंत्राटदारांना पुरेशी देयकांची रक्कम अदा केली जात नसल्याने असंख्य अडचणींचा सामना करावा लागत आहे. याच्या निषेधार्थ राज्यभरात आजपासून तीन दिवस लाक्षणिक संपाचे हत्यार कंत्राटदारांनी उपसले आहे. धुळे जिल्हा कॉन्ट्रॅक्टर्स असो.तर्फे आज सार्वजनिक बांधकाम मंडळाच्या अधिक्षकांना निवेदन देण्यात आले. त्यानंतर मागणीकडे लक्ष वेधण्यासाठी निदर्शनेही करण्यात आली.

निवेदनात म्हटले आहे की, धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील कंत्राटदारांनी सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत व इतरही शासकीय बांधकाम विभागात विकास कामे केलेली आहेत. मात्र गेल्या दोन वर्षांपासून कोट्यवधींची देयके रखडलेली आहेत. प्रत्येक वेळी सादर बिलाच्या केवळ दहा ते वीस टक्के एवढीच रक्कम प्राप्त होते. परिणामी, विकास कामे करणारे कंत्राटदार अडचणीत आले आहेत. याच्या निषेधार्थ राज्यभरात आपासून तीन दिवस कंत्राटदार लाक्षणिक उपोषण करणार आहेत. शासनाने गांभीर्याने विचार करून अरिष्ट अर्थचक्रातून कंत्राटदारांना बाहेर काढावे, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. तसेच मागणी मान्य न झाल्यास पुढील महिन्याच्या अखेरीस जिल्ह्यात सुरू असलेली सर्व प्रकारची कामे थांबविण्यात येतील, असा इशाराही देण्यात आला आहे. निवेदनावर धुळे जिल्हा कॉन्ट्रक्टर असो. चे अध्यक्ष संदीप महाले, सचिव प्रकाश पांडव यांचेसह सुधीर महाले, अरविंद राजपूत, नंदुरबार येथील सुभाष चौधरी, अविनाश मोरे, सतिष वाणी यांचेसह अजय कटारिया प्रदीप चौधरी, अभिनय गिते, संजय पाटील, प्रविण चौधरी यांची नावे व स्वाक्षर्या आहेत.



### कंत्राटदारांचे लाक्षणिक साखळी उपोषण

**दरम्यान राज्यस्तरावर आंदोलनाचे हत्यार उपसले असून संबंधित जिल्ह्यातील सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यालयाच्या समोर हे आंदोलन करण्यात आले. राज्यातील जवळपास दहा हजार कोटींची बिले थकली असून त्या पार्श्वभूमीवर लाक्षणिक साखळी उपोषण आंदोलन करण्यात आले. मकोण म्हणतंय देत नाही, घेतल्याशिवाय राहत नाही, सर्व कंत्राटदारांची बिले वेळेवर मिळालीच पाहिजेफ अशा प्रकारच्या घोषणा यावेळी आंदोलन कर्त्यांकडून देण्यात आल्या.**

## नेरला पांझरा नदीवर मोठ्या पुलास मंजूरी ; बांधकामासाठी १० कोटी रु.ची तरतूद

**धुळे । प्रतिनिधी**

धुळे ग्रामीणचे आ.कुणाल पाटील यांच्या विशेष प्रयत्नाने धुळे तालुक्यातील नेर येथे पांझरा नदीवर नेर ते नूरनगर दरम्यान मोठ्या पुलाच्या बांधकामास मंजुर मिळाली आहे. या पुलाच्या बांधकामासाठी पावसाळी अधिवेशनातील पुरवण्या मागण्यांमध्ये एकूण १० कोटी रुपयाचा निधीही मंजुर केला असल्याचे आ.कुणाल पाटील यांनी सांगितले आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, धुळे तालुक्यातील नेर ते नूरनगर दरम्यान पांझरा नदीवर मोठ्या पुलाचे बांधकाम करण्यात यावे अशी मागणी नेरसह परिसरातील लोकप्रतिनीधी तसेच नागरीकांची होती. नेर आणि परीसरातील विकासाला चालना देणारा हा पूल असल्याने हा महत्वाचा मानला जात आहे. धुळे ग्रामीणचे आ.कुणाल पाटील यांनी पुलाच्या मंजुरीसाठी वेळोवेळी अधिवेशनात आवाज उठविला होता त्याचप्रमाणे मंत्रालयीन पातळीवर पाठपुरावाही केला होता. त्यानुसार दि.१७ जुलैपासून मुंबईत पावसाळी अधिवेशन सुरु झाले आहे. आ.पाटील यांच्या पाठपुराव्यामुळे या अधिवेशनातील पुरवण्या मागण्यांमध्ये प्रजिमा ४९ ते नूरनगर-चिंचवार-नेर-लोणखेडी रस्ता प्रजिमा-८२ किमी १७/८०० मध्ये नेर गावाजवळ पांझरा नदीवर मोठ्या पुलाचे पोचमार्गासह बांधकाम करण्यास मंजुरी मिळाली आहे. पांझरा नदीवर नेर ते नूरनगर दरम्यान होणार्या या मोठ्या पुलासाठी एकूण १० कोटी रुपयांचाही निधी मंजुर करण्यात आला आहे. या पुलाच्या मंजूरीमुळे नेर,नूर नगरसह इतर दोन आदिवासी वसाहतीतील रहिवाशांची होणारी गैरसोय दूर झाली आहे. या पुलाच्या कामासाठी आ.कुणाल पाटील यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग धुळे यांना सर्व्हे करुन शासनास प्रस्ताव सादर करण्याच्याही सूचना दिल्या होत्या. त्यानुसार सर्व्हे करुन प्रस्तावाव्दारे पुलाची मागणी करण्यात आली होती. दरम्यान आ.कुणाल पाटील यांनी डिसेंबर २०२२मध्ये झालेल्या हिवाळी अधिवेशनात तारांकीत प्रश्न क्र.५६४१० नुसार नेर ते नूरनगर पुलाच्या बांधकामाचीही मागणी केली होती. आ.कुणाल पाटील यांच्या सततच्या पाठपुराव्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाच्यावतीने नेर-नूरनगर पुलाला मंजूरी मिळाली आहे.



### गैरसोय दूर होणार

**आ.कुणाल पाटील यांच्या प्रयत्नामुळे मंजूर झालेल्या नेर ते नूरनगर पुलामुळे नेरसह परिसरातील नागरीक,शेतकरी,वाहन धारक,प्रवासी,विद्यार्थ्यांची मोठी गैरसोय दूर होणार आहे. नेर येथील शेतकर्यांची शेकडो एकर शेती पांझरा नदीच्या पलीकडे नूरनगर परिसरात असल्याने शेतीच्या कामासाठी शेतकर्यांना सोय होणार आहे. त्याचप्रमाणे नेर, नूरनगरसह इतर दोन आदिवासी वस्ती तसेच चिंचवार, शिरधाणे प्र.नेर, गुलाबपाडा या गावातील नागरीकांचा दळणवळणाच्यादृष्टीने वेळ व पैशाची बचत होणार आहे. दरम्यान थेट देऊर, लोणखेडी,लोहगड परिसरातील नागरीकांचीही नेर-नूरनगरमार्गे चिंचवार-लामकानीकडे जाण्यासाठी प्रवासाची सोय होणार आहे.**

## दलेलपूर शिवारात बिबट्याचा मुक्तसंचार

### नागरिकांमध्ये भितीचे वातावरण

**नंदुरबार । प्रतिनिधी**

येथील माजी नगराध्यक्ष अजय परदेशी यांच्या तालुक्यातील दलेलपूर शिवारात असलेल्या शेतात बिबट्याच्या मुक्त संचार असल्याने परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे.

तालुक्यातील दलेलपूर शिवारात असलेल्या माजी नगराध्यक्ष अजय परदेशी यांच्या शेतात तयार केलेल्या विश्रामगृहाजवळ शुक्रवारी बिबट्याचा मुक्त संचार दिसून आला. फटाके फोडूनही बिबट्या तेथून पळ काढत नसल्यामुळे भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.वन विभागाने पिंजरा लावून तत्काळ या बिबट्यास जेरबंद करावे, अशी मागणी नगराध्यक्ष अजय परदेशी यांनी केली आहे. त्यामुळे वारंवार हिंसक प्राण्यांचा वावर असतो. दलेलपूर शिवारातील माजी नगराध्यक्ष परदेशी यांच्या शेतात बिबट्या हा भर दिवसा दुपारी तीन वाजेचा सुमारास शेतात तयार केलेल्या विश्रामगृहाच्या आवारात येऊन बसल्याचे शेतमजुरांनी पाहिले.याच विश्रामगृहावर बिबट्या डरकाळ्या फोडत बसला होता.

## बदल आणि कुरघोडी

राज्याच्या मंत्रिमंडळाचा विस्तार होऊन दोन आठवडे झाल्यानंतर खात्यांचे फेरवाटप जाहीर झाले. दबाव, कुरघोड्यांचे राजकारण त्यामागे होते हे स्पष्ट आहे. त्यांचा परिणाम आगामी काळात दिसेल.

राज्याच्या विस्तारित मंत्रिमंडळाचे खाते वाटप आणि खात्यांतील बदल, फेरफार वगैरे जाहीर झाले आहे. तीन पक्षांचे हे सरकार आहे. कोणाच्या वाट्याला 'काय' व 'किती' आले याची मोजदाद अजून काही दिवस चालेल. सरकारमध्ये नव्यानेच डेरेदाखल झालेले आणि उप मुख्यमंत्री बनलेले अजित पवार यांनी अर्थ व नियोजन ही महत्त्वाची खाती मिळवण्यात यश संपादन केले आहे. जेमतेम पंधरा दिवसांपूर्वी सत्तेत सहभागी झालेल्या त्यांच्या गटामुळेच खात्यांचे फेर वाटप रखडले होते. ते जाहीर होण्याच्या आदल्या दिवशी अजित पवार व प्रफुल्ल पटेल दिल्लीला गेले. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याशी चर्चा केल्यानंतर खाते वाटप जाहीर करण्याचा मार्ग मोकळा झाला. सध्या देशात राजकीयदृष्ट्या मजबूत स्थितीत असलेल्या भारतीय जनता पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांशी अजित यांनी काय चर्चा केली, त्यांना हवे असलेले खाते मिळवण्यासाठी त्यांनी शहा यांची कशी 'समजूत' घातली की दबाव तंत्राचा वापर केला, या गोष्टी गुलदस्त्यात आहेत; पण स्वत:बरोबरच आपल्या गटातील आठ जणांसाठी महत्त्वाची खाती पदरात पाडून घेण्यात अजित पवार यशस्वी झाले. यामध्ये शिंदे गट व भाजपच्या काही नेत्यांची काही खाती मात्र गेली. त्यामुळे सरकारवर काय परिणाम होईल का? हे लवकरच कळेल.

मतभेद व तडजोड

हे सरकार तीन पक्षांचे आहे असे म्हणण्यापेक्षाही भाजप व दोन गटांचे आहे. सत्तेत सहभागी होताना शिंदे गट व अजित पवार गट यांनी महत्त्वाच्या व ज्यांचे वर्णन 'मलईदार' असे केले जाते, त्या खात्यांवर दावा केला होता. त्यावरून तिघांत तीव्र मतभेद होते; पण कोणी ते मान्य करत नव्हते. शेवटी सत्ता राखणे महत्त्वाचे या मुद्द्यावर तडजोड झाली असावी. खात्यांच्या फेर वाटपात भाजपने सहा प्रमुख खाती गमावली आहेत, तर शिंदे गटाला तीन खात्यांवर पाणी सोडावे लागले आहे. खुद्द मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावरील खात्यांचा भार बराच कमी झाला आहे. त्यांच्याकडे आता सामान्य प्रशासन, माहिती तंत्रज्ञान वगैरे खाती आहेत. 'मुख्य मंत्री' हे सर्वात महत्त्वाचे पद त्यांच्याकडे असल्याने त्यांची खाती दुय्यम आहेत, असे म्हणता येणार नाही. कोणत्याही सरकारमध्ये गृह व अर्थ ही खाती सर्वात महत्त्वाची मानली जातात. शिवसेनेत फूट पाडून सत्ता मिळवण्यात भाजप यशस्वी झाला, त्यात प्रमुख भूमिका देवेंद्र फडणवीस यांची होती. मुख्यमंत्रिपदावर पक्षाने हक्क सांगितला नाही; पण गृह व अर्थ आणि नियोजन ही खाती फडणवीस यांनी स्वत:कडे ठेवली. फेर बदलात गृह त्यांच्याकडे राहिले; पण अर्थ व नियोजन ही खाती अजित पवार यांना देणे भाग पडले आहे. अजित यांना ही खाती देण्यास शिंदे गटाचा तीव्र विरोध होता. महाविकास आघाडीचे सरकार असतानाही अर्थ व नियोजन अजित पवार यांच्याकडेच होते. मात्र, ते शिवसेनेच्या आमदारांना पुरेसा निधी देत नसल्याची तक्रार होती. पक्षातून बाहेर पडण्याचे तेही एक प्रमुख कारण होते, असे शिंदे गटातील आमदारांचे म्हणणे आहे. या विरोधावर अजित यांनी मात केलेली दिसते. आपल्या गटाचे जेथे प्राबल्य आहे तेथे जादा निधी देण्याची तरतूद करणे आता अजित पवार यांना शक्य होणार आहे. सहकार हे ग्रामीण महाराष्ट्रावर पकड ठेवण्यासाठी महत्त्वाचे खाते आहे. भाजपकडे ते खाते असताना अजित यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांच्या साखर कारखान्यांची चौकशी सुरु झाली होती. पूर्वी शरद पवार यांचे निकटवर्ती असलेले दिलीप वळसे-पाटील यांच्याकडे सहकार खाते आल्याने व कृषी खाते देखील धनंजय मुंडे यांना मिळाल्याने अजित पवार गटास ग्रामीण भागात आपले वर्चस्व वाढवण्यात मदत होईल. राज्याच्या पुढील विधानसभा निवडणुकीत तीन्ही पक्षांची आघाडी पूर्ण बहुमताने सत्तेत येईल, असा दावा फडणवीस यांनी केला आहे; पण राजकारणात मैत्री भावनेवर आधारित नसते. आपल्याला गटाला जागा किती? आम्ही सहकार्य केल्यास आम्हास काय मिळणार? हे कठोर मुद्दे महत्त्वाचे ठरतात. सध्या तरी अजित पवार गटाचे सरकारमध्ये वर्चस्व असल्याचे दिसते. आगामी काळात कोणता गट बाजी मारेल ते तेव्हा दिसेलच!

# आला श्रावण अधिक आणि दीपपूजेसह

**यंदा १८ जुलै ते १६ ऑगस्टदरम्यान अधिक श्रावण मास आहे. यंदाचा श्रावण रम्य आहे, तर अधिक मास आराधना, दान-पुण्य वा इतर पारमार्थिक कामांसाठी महत्त्वपूर्ण आहे. दरम्यान, दीपपूजेच्या निमित्ताने आषाढ अमावस्यादेखील लक्षवेधी ठरणार आहे. श्रावण अधिक असल्यामुळे यंदा दोन महिने या मनोरम मासाचा आनंद लुटता येणार आहे. श्रावणी सणावारांना अवकाश असला तरी त्याचे वेध लागले आहेत. त्यानिमित्ताने**



बरीच प्रतीक्षा केल्यानंतर आता सर्वदूर पावसाला चांगली सुरुवात झाली आहे. ऋतूने कुस पालटली आहे. यंदा अधिक मास असल्यामुळे समस्त महिन्यालाच वेगळे महत्त्व असून अधिक श्रावण कसा साजरा करायचा, याचे बेत आखणे घरोघरी सुरू झाले असेलच. श्रावण रम्य आहे तर अधिक मास आराधना, दान-पुण्य वा यासारख्या अन्य पारमार्थिक कामांसाठी महत्त्वपूर्ण मास आहे. त्यामुळेच यंदा ही पर्वणी आनंददायी ठरणार आहे. या वर्षी दोन श्रावण महिने येत आहेत. १८ जुलै ते १६ ऑगस्ट दरम्यान अधिक मास आहे. बरोबर १९ वर्षांपूर्वी २००४ मध्येही अशीच परिस्थिती होती. त्या वेळीही १८ जुलै ते १६ ऑगस्ट या कालावधीत श्रावणातच अधिक मास झाला. अधिक मास हा अधी मास, संसारप मास, पुरुषोत्तम मास, आसंक्रांती मास, मलिमलूच मास इत्यादी नावांनी देखील ओळखला जातो. ज्योतिषशास्त्राच्या गणनेनुसार, सूर्यमालेचे विश्व ३६० अंशांचे आहे. सूर्य एका वर्षात एकूण ३६५ दिवस आणि सहा तासांमध्ये एक परिक्रमा पूर्ण करतो, तर चंद्र पाच तासांमध्ये ३५४ दिवस पूर्ण करतो. त्यामुळे सौर वर्ष आणि चांद्र वर्ष पूर्ण होण्यात ११ दिवसांचा फरक आहे. त्यानंतर तिसरे वर्ष पूर्ण होण्यात ३६ दिवसांचा फरक आहे. त्यामुळेच सौर महिना आणि चांद्रमास यांचा समतोल साधण्यासाठी भारतीय कालगणनेने ३२ महिने आणि १६ दिवसांनी अधिक मास स्थापन केला आहे.

या महिन्यात सर्व प्रकारचे शुभविवाह वा कार्य करण्यास मनाई आहे. या काळात पुराण श्रवण, देवकथा, पुण्यकार्ये, उपवास, स्नान, दान, भगवान शिवाची पूजा, ज्योतिर्लिंगाची पूजा, जलाभिषेक, रुद्राभिषेक, शिवार्चन, संकीर्तन, पूजा, भजन अशी सर्व धार्मिक कार्ये केली जातात. भगवान शिवाची आराधना, पुराण श्रवण आणि नामस्मरण केल्याने सर्व अशुभ दूर होतात अशी भाविकांची श्रद्धा आहे. श्री विष्णूची पूजा करणे, गीता पठण करणे, श्री राम कृष्णाच्या नावाने मंत्र जपणे, अष्टाश्रर नारायण मंत्र, द्वादशाक्षर श्री वासुदेव मंत्र, अन्नदान करणे इत्यादी शुभ कर्मे करतो त्या व्यक्तीला गोलोकात प्रवेश मिळतो असेही भाविक मानतात. अधिकात भगवान विष्णूचे अवतार उत्सवदेखील साजरे केले जाऊ शकतात. यामध्ये वामन जयंती, पार्श्वनाथ जयंती, रामनवमी, नरसिंह जयंती आणि कृष्ण जन्माष्टमी यांचा समावेश आहे. याप्रसंगी त्यांच्या अवताराच्या कथेचे पारायण, स्तोत्र संगीत आदी विधी पार पडतात. अधिक मासामध्ये अन्नदान करण्याचे विशेष महत्त्व सांगितले जाते. या संपूर्ण महिन्यात दररोज वा जमेल तसे अन्नदान करावे. ३३ जोडप्यांना जेवायला बोलावून त्यांचा यथाशक्ती सन्मान करावा. खेरीज या काळात जावयाला भेटवस्तू देण्याचेही महत्त्व आहे. या महिनाभरात जमेल तसे जावयाला जेवायला बोलावून त्याला अनारशाचे वाण देणे महत्त्वाचे मानले जाते. जावयाबरोबरच लेकीलाही यशाशक्ती भेटवस्तू दिली जाते. काही घरांमध्ये या मासानिमित्त सगेसोयरे एकत्र येऊन गरजूंना मदतही करताना दिसतात. अशाप्रकारे प्रत्येक जण आपल्या भावना, संवेदनांनिशी या मासाचा आनंद घेतो.

अधिक मास आषाढ अमावस्येच्या दुसऱ्या दिवसानंतर सुरू होत आहे. आषाढ अमावस्या हादेखील एक महत्त्वपूर्ण दिवस आहे. या अमावस्येला दीपपूजा केली जाते. त्या दिवशी घरातील सर्व दीप स्वच्छ करून, तेल-वात करून प्रज्वलित केले जातात. त्याची यथासांग पूजा केली जाते. काही घरांमध्ये कणकेचे वा बाजरीच्या भरड्याचे दिवे करून नैवेद्य दाखवला जातो. दिव्यांची आरास रांगोळीने सुशोभित केली जाते. अशा प्रकारे अंधाऱ्या रात्री प्रकाशमान करणाऱ्या दीपांप्रती कृतज्ञता व्यक्त करून श्रावणाचे स्वागत करण्याची आपली विचारधारा वंदनीय म्हणावी लागेल. यंदा श्रावण अधिक असल्यामुळे दोन महिने या मनोरम मासाचा आनंद लुटता येणार आहे. श्रावणात निसर्गाचे विलोभनीय रूप पाहायला मिळते. भरलेली शेते-शिवारे नजरेला अतीव आनंद देतात. शेतीच्या कामांची लगबग बघताना श्रमिकांप्रमाणेच भटक्यांचे मनही निसर्गात रमते. ऊन-सावल्यांचा रम्य खेळ त्यांना नित्याच्या व्यापतापापासून दूर नेतो. सध्या वर्षा पर्यटनाचे प्रमाण वाढले आहे. त्यातही भात लागवणीचा आनंद देणाऱ्या कार्यक्रमांची रेलचेलही वाढली आहे. त्यामुळे यापूर्वी शेतीच्या कामाचा अनुभव नसणारे पण त्याचे अप्रूप असणारे, वा तो आनंद घेऊ इच्छिणारे लोक आवर्जून अशा कार्यक्रमांकडे वळताना दिसत आहेत. गेल्या काही वर्षांमध्ये या पर्यटनाने आकार घेणे हे कृषी उद्योगाला मिळालेले नवे वळण आहे, असेही आपण म्हणू शकतो. साहजिकच यंदा श्रावण अधिक असल्यामुळे पर्यटक आणि शेतकऱ्यांचा हा आनंदही द्विगुणीत होणार आहे, असे म्हणावे लागेल.


श्रावणाचे महत्त्व हेच की तो अनेक सुंदर रूढी-प्रथा-परंपरांची सुंदर माला घेऊन येतो. सृष्टीचा गाभारा हिरवाईने बहरल्यानंतर, जलधारांचं नृत्य ऐन भरात आल्यानंतर, मेघांचं आच्छादन पसरल्यावर येतो तो हा श्रावण! सण, उत्सव ही श्रावणाची अविभाज्य अंगं आहेतच पण या सगळ्यांमुळे होणारी वातावरणनिर्मिती अधिक सुंदर असते. आधी उल्लेख केल्याप्रमाणे अलीकडच्या व्यस्त दिनचर्येत प्रत्येकाला अथवा प्रत्येकीला मनासारखे जगता येतेच असे नाही. पण विशेष दिवसांच्या निमित्ताने बदलणाऱ्या सामाजिक वातावरणाचा प्रभाव मात्र खात्रीने दिसून येतो. तिन्हीसांजेला एखाद्या घरात धूप लावला तरी तो संपूर्ण परिसर सुगंधी होतो. त्याचप्रमाणे श्रावण आला की सगळीकडे मंगलमय वातावरण पसरतं. जाई-जुई-चमेली-गुलाब-केवडा आदी फुलांनी सजलेला बाजार बघितला तरी तनामनाला वेगळीच टवटवी येते. केळीचे हिरवेकंच खुंट, विड्यांच्या पानांची गर्द हिरवी छटा, दुर्वांचा तो रसरशीत ताजेपणा, नाजूकशी कमळे, मैलभर अंतरापर्यंत दरवळ पसरवणारा चाफा, पानांनाही झाकून टाकेल अशा प्रकारे बहरलेली जास्वंद, नारळाचे ढीग, टपोऱ्या सुपाऱ्यांची मोहक मांडणी आणि या सगळ्या सजावटीत उठून दिसणारी तेवढीच रसरशीत फळे पाहिली की का कोण जाणे, सगळे कसे मंगलमय भासू लागते. कुठल्याशा घरातून मंत्रांचे स्वर आणि आरतीचा उच्चारव कानी पडला तरी मनाचा एक कोपरा प्रसन्नतेने भरून जातो. कुठल्याशा वस्तीबाहेरच्या झाडाला झोका टांगून त्यावर उंचच उंच झोके घेणारी मुले पाहिली की, आपले मनही आनंदाच्या लाटांवर झुलत असल्यासारखे वाटते.

अर्थात यंदा या सणावारांची सुरुवात होण्यास थोडा अवधी असला तरी आतापासूनच त्याचे वेध लागले आहेत. देव्हारा सजला आहे. अधिकाच्या निमित्ताने त्यात विविध देवताही विराजमान झालेल्या आहेत. त्यामुळे ही आनंदोत्सवाची मंगलमय सुरुवात आहे, हे नक्की. श्रावण सर्वव्यापी आहे. ऊन श्रमवणारे आणि सावली सुखावणारी असली तरी या दोन्ही स्थिती सतत बदलत असतात ही समज देणारा हा काळ. म्हणूनच तो अधिक रम्य आणि मंगलमय आहे. श्रावण आणि अधिक हे दोन्ही मास कोणाला पूजा-अर्चांमध्ये अडकवून ठेवतात, तर कोणाला आनंदाचे रंग उधळण्याची मुक्त सूट देतात. एकीकडे कर्मकांडांचे महत्त्व सांगतानाच ते एकमेकांशी स्नेहबंध सुधारण्याचे मंगलमय मुहूर्तही घेऊन येतात. सजलेल्या निसर्गात जाऊन रममाण होण्याची संधी देणारे अनेक सण, व्रतवैकल्ये आपल्याला नवऊर्जा आणि नवचेतना देऊन जातात. आसक्ती आणि निवृत्तीचे भान देऊन जातात. आनंदालाही आध्यात्माची चौकट हवी, हा विचारही अशा संगमामुळे जागृत होतो. सुखाचा संयमाने स्वीकार करणे आणि मिळालेल्या प्रत्येक चांगल्या गोष्टीसाठी कृतज्ञतेची भावना व्यक्त करण्याची शिकवण अशा संस्कारांमुळेच मिळत जाते. म्हणूनच श्रावण शेतात पेरलेल्या धान्याचे आणि मनात पेरलेल्या सद् विचाराचे पोषण करतो, असे म्हणता येईल.

आताही असाच एक सुंदर काळ सुरू झाला आहे. लवकरच सणवार साजरे होतील. आपली धांदल उडवून देतील. मंगळागौर, नागपंचमी, राखी पौर्णिमा, गोकुळाष्टमी असे सण नेहमीच्या धामधुमीत पार पडतील. नवीन वस्त्रांची सळसळ सुखावेल. बहीण-भावामधल्या नात्याला प्रेमाची आणखी एक गाठ दृढ करेल. देवळाराऊळांमधून कथा-कीर्तनं पार पडतील. कुठलेसे महाराज प्रवचने सांगतील. वृद्ध महिला मनोभावे पूजा करतील. आपल्या घरातले गोकुळ आरोग्यसंपन्न राहो, अशा मंगल कामनेनिशी माता देवापुढे सांजदिवा लावतील. हे सगळे उपचार पार पाडणे शक्य असेल, तर सोन्याहून पिवळे पण शक्य नसेल तर त्यांचा यथोचित मान राखत मनात मंगलमय विचाराचे आणि शुद्ध आचाराचे व्रत मात्र नक्की अंगीकारावे. कारण मशागत केलेल्या अशा मनातच सुविचारांची रुजवण होते आणि मग रोजचा दिवस अधिक तसेच श्रावणासमान आनंद देऊन जातो.

**- ऊर्मिला राजोपाध्ये**

## शब्दकोडे-१२३



आडवे शब्द

१. दृढ, पक्का ३. देखणा ६. मृत्युसमय ९. पाऊल (हिंदी) १२. चांदी १४. सरिता १५. विटीसाठी खणलेला खड्डा १६. पुख्खा झोडणे १८. हनुमानाच्या या नावात एक पांडवही आहे १९. गंध २०. अंत:करण २२. बोच २३. शृंगार (हिंदी) २६. संगीतातील एक राग २८. इंग्रजांच्या काळची एक पदवी ३०. गणपती ३१. खिडकी ३२. जमिनीवरील कर ३३. चिक्कू, कंजूष ३४. रात्र ३५. महिना ३८. कमळ ३९. सावध ४०. अप्पलपोटा ४२. कणिक भिजण्याचे पात्र ४४. निरोगी ४५. याला अक्कल नसते अशी म्हण आहे ४७. लाकूड ४८. आणि ४९. दमट, ओलसर ५१. पराभव, हार ५२. पशूतुल्य मनुष्य ५३. मत्सर, द्वेष ५५. मस्ती ५७. लोणच्यासाठी चिनीमातीची चांगली! ५८. चांदी ६०. उसाचा रस काढण्याचे यंत्र ६२. रात्र ६४. पापणी (हिंदी) ६५. मदत करणारे ६७. स्त्री ६८. भक्त प्रल्हादाची आई ६९. तारणारे ७१. प्रमाणपत्र, दाखला ७३. ब्राह्मण ७५. मराठी मुळाक्षरातील पहिले ७६. हात ७७. उटण्यातील सुवासिक वनस्पती ७९. विशाल, उत्कृष्ट ८०. एक प्रकारचा क्षार ८१. सैनिकांना केला जाणारा मालपुरवठा ८२. सारखे

उभे शब्द

१. अगदीच ऐकू न येणारा २. टप्पा ४. लोक ५. भांगात घालायचा एक दागिना ६. शरीर ७. मऊ ८. वेल ९. जास्तीत जास्त १०. भाव, किंमत ११. सापाची विषारी जात १३. तेव्हा (हिंदी) १७. उधार १९. दिवस २१. डोळे २३. कुंकू (हिंदी) २४. थंड, शीत २५. अबोध २७. देवाचे द्वारपाल २९. वस्ती २९अ. ठीक ३०. न बोलता, मुकाट्याने ३४. राजाविषयी निष्ठा असणारा ३५. गावचा कारभारी अधिकारी ३६. शिवरायांच्या अष्टप्रधानांपैकी एक ३७. दयाळू ३८. आदरार्थी संबोधन ३९. प्रसंगावधान ४१. जवळीक ४३. रात्री सुगंध पसरवणाऱ्या फुलांचे झुडूप ४६. खर्चाच्या उलट ४७. आसामचे जुने नाव ५०. एक उभयचर प्राणी ५२. जीवघेण्या वेदना ५४. मित्र (हिंदी) ५६. डोळ्यातील बाहुली (सं.) ५७. अंड्याच्या आतील भाग ५९. कंबर ६१. सोने ६३. तीव्र रेचक ६६. चंद्रोदयाबरोबर उमलणारे कमळ ७०. विष्णू ७२. परका, अपरिचित ७३. मनोभंग ७४. आनंद (सं.) ७६. पदार्थाचा लहान अंश ७८. मगज ७९. नकलून काढलेला मजकूर

### शब्दकोडे १२२ चे उत्तर

**आडवे उत्तर**

१.उडाणटप्पू ४.समाधानकारक ९.दावा ११.ममता १२.गवा १३.टकमक १५.आडाखा १६.जनता १७.कर १८.कस १९.नाक २०.आनन २१.पोळपाट लाटणे २३.कडक २४.नत २५.पंक २६.नीरस २७.जकातदार २९.ओरखडा ३१.रदन ३२.मरणयातना ३५.रजत ३६.हरा ३९.करडा ४१.हजरजबाबी ४४.अवाजवी ४६.पाया ४७.नीरद ४९.जातपात ५०.कलाकार ५३.आराधना ५४.शमन ५६.बरवा ५७.मध ५८.थबकणे ६१.खेद ६२.लाडका ६५.रमावर ६८.नरवीर ७०.ईश्वर ७१.रीस ७३.गजानन ७५.पोळा ७६.मठ्ठ ७७.मस्त ७८.खलनायक

**उभे उत्तर**

२.डाकोडाक ३.टप ४.समता ५.माता ६.नगरपाल ७.कावा ८.कटकट ९.दाम १०.वाकडातिकडा ११.मनन १४.कसणे १५.आनाकानी करणे १६.जनकजननी १७.कळ २०.आड २१.पोतदार २२.लाथ २३.कसरत २४.नतमस्तक २५.पंख २८.रणगाडा ३०.रजपज ३३.तहहयात ३४.नाराज ३७.कोबी ३८.रजनीनाथ ४०.रमजान ४२.रत्नाकर ४३.बारका ४४.अपराध ४५.वीर ४६.पापा ४८.दशक ५१.लावालावी ५२.रडका ५३.आमराई ५५.मणेर ५६.बदन ५९.बकरी ६०.अवजार ६३.डरपोक ६४.नरम ६६.माग ६७.रन ६९.रसना ७२.सम ७४.नख

## एसटी आगाराकडे लक्ष कोण देणार?

मुंबई शहराच्या दक्षिण बाजूस प्रवास करीत गेले की, दक्षिण मुंबईच्या रस्त्यावर बऱ्याच लाल रंगाच्या दुमजली बस दिसून येत होत्या. मात्र आता या पारंपरिक बस दिसत नाहीत. त्याऐवजी आता लाल-काळ्या रंगाच्या दुमजली बस काचेच्या आवरणात लपेटलेल्या विद्युत बस दिसतात. केवळ मुंबईची शान आहे म्हणून रस्त्यावर नव्या पद्धतीने आणल्या गेलेल्या या बसेस खरंच व्यावहारिक आहेत का? पुन्हा या बसेस मुंबईच्या रस्त्यावर आणल्याचे नक्की काय प्रयोजन? पुन्हा या दुमजली बसेस बेस्टला त्याचे पुनर्वैभव प्राप्त करून देतील का हे पाहणे औस्तुक्याचे ठरणार आहे.

मुळात या आधी दुमजली बसचा इतिहास समजून घेणे आवश्यक ठरते. स्वातंत्र्यपूर्वकाळात १९३८ साली मुंबईच्या रस्त्यावर या बस आणल्या गेल्या. एका बसमधून जास्तीत जास्त प्रवासी वाहून नेणे, हा त्या मागचा उद्देश होता. हा उद्देश सफल झाल्यानंतर या बसमध्ये वाढ करण्यात आली. ही वाढ इतकी झाली की, कालांतराने ८० च्या दशकात बेस्टच्या ताफ्यात तब्बल ९०१ दुमजली बस दाखल झाल्या होत्या. ९० च्या दशकात या बसेस कुलाब्याच्या नेव्ही नगरपासून दहिसर पुलापर्यंत, तर पूर्वेस मुलुंड चेक नाक्यापर्यंत धावत होत्या. नंतर नवी मुंबईच्या सीबीडी बेलापूरपर्यंत या बसचा अगदी मुक्त वावर होता. त्याकाळी मुंबईच्या रस्त्यावर व उपनगरात या बसेससाठी पोषक वातावरण होते. रस्ते मोकळे होते, इतर गाड्यांची संख्याही कमी होती. त्यामुळे लांब टप्प्याचे असंख्य बसमार्ग ही दुमजली बस सहज पार करत होती. मात्र ९० च्या दशकानंतर खुल्या आर्थिक धोरणानंतर परिस्थितीत बदल होत गेला. मुंबई बदलत होती. मुंबईत प्रचंड प्रमाणात वाहतूक वाढली. ही रहदारी सुकर व्हावी म्हणून मुंबईत जागोजागी पूल उभारले जाऊ लागले. मग माणसांना चालायला स्कायवॉक बांधण्यात आले. याचीच परिणिती रस्त्यावर वाहतूक कोंडी होऊ लागली. या बस गाड्या वाहतूक कोंडीत अडकून राहू लागल्या, तर काही ठिकाणी दुमजली बस बंद कराव्या लागल्या. सध्या बेस्टच्या ताफ्यात शेवटच्या १५ बसगाड्या आहेत. त्याही १ ऑक्टोबरपर्यंत बस ताफ्यातून बाद होतील व इतिहासजमा होतील. त्या जागी विद्युत वातानुकूलित दुमजली बस ताफ्यात समाविष्ट होतील. मात्र या बसेस बेस्टच्या स्वमालकीच्या नसून कंत्राटदाराच्या असतील. स्वमालकीच्या दुमजली बस इतिहासजमा होण्याचे आणखी एक कारण म्हणजे उच्च न्यायालयाचा निर्णय. ज्याने बेस्टला बसची पंधरा वर्षांची मुदत घालून दिली. त्यामुळे पंधरा वर्षांपर्यंत बेस्टला मुंबईच्या शहरात बस चालवणे शक्य आहे.

**क्रमश:** **मुंबई डॉट कॉम: अल्पेश म्हात्रे**

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
**'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय** - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय-** बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
**नंदुरबार कार्यालय** - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

# समर्थ केंद्रात स्वसंरक्षणाचे धडे महिलांचा उस्फुर्त प्रतिसाद




**नाशिक । प्रतिनिधी**

अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ केंद्र आणि समर्थ गुरुपीठाच्या वतीने विद्यार्थी विशेषतः मुली आणि महिलांना स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण देण्याचा उपक्रम व्यापक प्रमाणात हाती घेण्यात आला आहे. रविवारी नाशिक महानगरातील गंगापूररोड येथील उदयनगर केंद्रात या उपक्रमाचा शुभारंभ नितीन मोरे, आ. देवयानी फरांदे, माजी नगरसेविका स्वाती भामरे व अन्य मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आला.

समर्थ गुरुपीठसह देशभरातील सर्व केंद्राच्या माध्यमातून हा उपक्रम मोठया प्रमाणात राबवून खऱ्या अर्थाने महिला सक्षमीकरण करण्यासाठी हा कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. उपक्रमाचा शुभारंभ दीप प्रज्वलनाने झाल्यानंतर उपस्थित विद्यार्थी, पालक, सेवेकरी यांचेशी संवाद साधताना नितीन मोरे म्हणाले, आज आपल्या घरातील, समाजातील महिला, मुली किती असुरक्षित आहेत ते आपण रोज अनुभवत आहोत. यासंबंधित मनाला यातना देणाऱ्या बातम्या आपण प्रसार माध्यमातून रोज पाहतो, वाचतो, ऐकतो. या बातम्यांनी मन प्रचंड अस्वस्थ होते. परंतु आता या गोष्टीचा फक्त निषेध व्यक्त करून, दुःख व्यक्त करून चालणार नाही तर आपल्याला यासाठी आता आपल्या घरातील माता-भगिनींना शरीराने, मनाने सशक्त करावे लागेल आणि यासाठीच गुरुमाऊली यांच्या आशिर्वादाने हा समाजपयोगी कार्यक्रम आपण हाती घेतला आहे असेही ते म्हणाले.

मान्यवरांचे मनोगत झाल्यानंतर केंद्राच्या आवारात प्रशिक्षण देण्यात आले. यात महिला व मुलींनी उस्फुर्त सहभाग नोंदवला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सेवामार्गाचे जिल्हा प्रतिनिधी घोडेराव, केंद्र प्रमुख सूर्यवंशी, निंबा शिरसाठ, विजय पाटील यांनी परिश्रम घेतले. दरम्यान प्रशिक्षणार्थींना दुपारी महाप्रसाद वाटपही करण्यात आले.

# दिव्यांगांना पिवळे रेशन कार्ड त्वरित द्यावे : भाजप दिव्यांग विकास आघाडीची मागणी

**नाशिक । प्रतिनिधी**



दिव्यांगांना पिवळे रेशन कार्ड मिळत नसल्याने त्यांची परिस्थिती अतिशय हलख्याची बनली असून उपासमारही होत आहे. तरी दिव्यांगांना पिवळे रेशन कार्ड

त्वरित द्यावे. अशी मागणी भाजप दिव्यांग विकास आघाडीचे जिल्हा उपाध्यक्ष बाळासाहेब घुगे यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, महाराष्ट्र शासनने दिव्यांगांचे जीवनमान उंचावण्यासाठी विविध शासन निर्णय घेतले आहेत. यामुळे दिव्यांगांना विविध योजनांचा लाभ मिळणार आहेत. त्यात शिक्षण सुविधा, अवयव लाभ सुविधा, स्कॉलरशिप सुविधा, आरोग्य विभागातील तपासणी सुविधा, स्वतःच्या पायावर उभे राहून काम धंदा करण्यासाठी अर्थसाह्य मिळणे कामे आदी सुविधांचा समावेश आहे. परंतु धान्य वितरण अधिकारी यांच्या कार्यालयातून दिव्यांगांना पिवळे रेशन कार्ड मिळत नाही.

या कामासाठी अनेक वेळा चकरा माराव्या लागतात. तरीही कामकाज न झाल्याचे उत्तर मिळत असते. कार्यालयात चौकशीला गेल्यानंतर पुढच्या आठवड्यात या हेच वर्षभर उत्तर मिळत असते.

सर्वसाधारण लाभार्थ्यांना दोन दिवसात पाच हजार रुपये देऊन रेशन कार्ड मिळत आहे, पैसे घेऊन कामे दोन दिवसात केले जात आहेत. मात्र दिव्यांगांना वर्षभर वाट बघावी लागते. त्यातही एखाद्याने तक्रार केल्यास त्याचे काम कागदपंत्राची पूर्तता नाही म्हणून अपूर्ण ठेवून जाणीवपूर्वक त्रास दिला जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

दिव्यांगांना त्यांचा अधिकार मिळण्यासाठी पिवळे रेशन कार्ड लवकर मिळावे अशा आशयाचे निवेदन धान्य पुरवठा अधिकारी कैलास पवार यांना देण्यात आले. यावेळी दिव्यांग विकास आघाडीचे जिल्हा उपाध्यक्ष बाळासाहेब घुगे, विजय पाटील, घनश्याम अनभुले, अशोक निकम, रमाकांत ठाकरेंसह असंख्य दिव्यांग बांधव उपस्थित होते.

**ॲड. महेश अ.चव्हाण**
**निशाणी नं.६**

## जाहिर नोटीस

**धुळे येथील मे.२ रे सह दिवाणी न्यायाधिश सो. क.स्तर धुळे यांचे कोर्टात**
**दिवाणी किरकोळ अर्ज नं. ८६७/२०२३**

श्री.नरेंद्र रामकृष्ण जकातदार वै. .....**अर्जदार**
**विरुध्द**
**कोणीही नाही** ...**सामनेवाला**
मिराबाई रामकृष्ण जकातदार ...**(मयत)**

ज्या अर्थी अर्जदार यांनी मयत मिराबाई रामकृष्ण जकातदार हे दि. २५/०८/२००७ रोजी मौजे गल्ली नं. ६, जुने धुळे, ता. जि. धुळे येथे मयत झाले. त्यामुळे अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे प्रमाणे कायदेशीर वारस ठरवून मिळणेकरीता सदरचा दावा मे. कोर्टात दाखल केलेला आहे.

त्या अर्थी जर कोणत्याही व्यक्तीस काहीही हरकत असेल तर त्यांनी वर नमुद केसचेकामी दि. २३/०८/२०२३ रोजी सकाळी १०.३० वाजेच्या सुमारास मे. कोर्टात व्यक्तीशः व आपल्या वकिलांमार्फत हजर राहून आपले म्हणणे/हरकत नोंदवावी मे. कोर्टाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखे पर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे काम काज पुर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण :- धुळे
दिनांक :- १५/०७/२०२३ आदेशावरुन

**कामगिरी कारकुन** (शिक्का) **अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय व.स्तर,धुळे** **दिवाणी न्यायालय व.स्तर,धुळे**

# प्रा. डॉ. आश्रुती पाटील यांना मायक्रोबायोलॉजीत पी.एचडी

**नाशिक । प्रतिनिधी**



येथील मराठा विद्या प्रसारक संस्थेच्या के.टी. एच. एम महाविद्यालयातील सहायक प्राध्यापिका डॉ. आश्रुती जयराज पाटील (पवार) यांनी एग्रीकल्चर मायक्रोबायोलॉजी यामध्ये एप्लीकेशन ऑफ बायो स्टीमुलेशन अँड बायोकंट्रोल फॉर सेपा ग्रोथ इम्प्रूमेंट या विषयात पीएचडी प्राप्त केली आहे.

गुजरात विद्यापीठातून त्यांनी मायक्रोबायोलॉजी हा विषय घेऊन एम.एस.सी केले असून, त्या महाविद्यालयात मध्ये टॉपर होत्या. आपल्या सखोल संशोधनातून त्यांनी मिळवलेल्या यशाचा शेतकरीवर्गासाठी निश्चितच लाभ होणार असून शेतीविषयक अनेक जटील प्रश्न सोडवण्यासह कृषी क्षेत्रात अनेक नवनवीन काम कारण्यावर त्या भर देणार आहेत. जेणेकरून सेंद्रिय शेती करणे अधिक सुलभ होईल असे डॉ. आश्रुती पाटील यांनी या यशाबद्दल प्रतिक्रिया देतांना सांगितले. डॉ. आश्रुती सध्या के. टी. एच. एम. कॉलेज येथे बायोटेक्नॉलॉजी डिपार्टमेंट मध्ये सहायक प्राध्यापक या पदावर कार्यरत आहे. शैक्षणिक क्षेत्रात त्यांचा ८ वर्षांचा अनुभव आहे. पी एचडी केल्याबद्दल त्यांचे मविप्रचे सेक्रेटरी ड. नितीन ठाकरेसह, महाविद्यालयाचे प्राचार्य, सहकारी प्राध्यापक आदिंनी अभिनंदन केले आहे.

# इक्विटास डेव्हलपमेंट इनिशिएटिव्ह ट्रस्टतर्फे बचत गटातील महिलांना मोफत शिलाई मशीन प्रशिक्षण, मशीन वाटप

**नाशिक । प्रतिनिधी**



इक्विटास डेव्हलपमेंट इनिशिएटिव्ह ट्रस्ट बचत गटातील महिलांना आत्मनिर्भर व सक्षम करण्यासाठी रोटरी क्लब ऑफ मुंबई दिवास व बॉम्बे राऊंड चॅरिटेबल ट्रस्ट, मुंबई या संस्थेच्या माध्यमातून शिवण क्लासचे १५ दिवसांचे प्रशिक्षण वर्ग फुलेनगर या ठिकाणी सुरू करण्यात आले होते. यावेळी १२ शिलाई मशीनचे मोफत वाटप करण्यात आले.

या प्रशिक्षणाच्या माध्यमातून प्रशिक्षणार्थी हे आत्मनिर्भर होऊ शकणार आहेत. कार्यक्रमाच्या वेळी व्यासपीठावर इक्विटास बँकचे डिव्हिजनल मॅनेजर अतुल पाटील होते. तसेच सागर त्रिभुवन, आनंद शेलार, संग्राम पाटील, दिनेश पाटील, प्रकाश नायकडा आदी उपस्थित होते. शिलाई मशीनचे प्रशिक्षण जयश्री आहेर यांनी दिले. सूत्रसंचालन कार्यक्रमाचे समन्वयक दिनेश पाटील यांनी केले. तसेच अतुल पाटील यांनी महिलांना आत्मनिर्भर व स्वयंरोजगार कसा प्राप्त होऊ शकतो? आर्थिक व सामाजिक सक्षम होण्यासाठी तुम्ही स्वतःचा व्यवसाय सुरू करू शकतात याची माहिती दिली. कार्यक्रमाचे आभार संग्राम पाटील यांनी मानले.

**ॲड.संतोष बी. बोरसे**
**निशाणी नं.६**

## जाहिर नोटीस

**धुळे येथील मे. २ रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर. सो. यांचे कोर्टात.**
**दि.कि.अर्ज नं ८५८/२०२३**

मंगला सोमनाथ बाविस्कर वगैरे .....**अर्जदार**
**विरुध्द**
**कोणीही नाही**
(कै. सोमनाथ जगन्नाथ बाविस्कर -मयत) ...**जाबदेणार**

ज्याअर्थी अर्जदार यांनी धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश (व. स्तर) सो. यांचे न्यायालयात दि. १३/७/२०२३ रोजी दि. कि. अर्ज नं.८५८/२०२३ चा अर्ज दाखल केलेला आहे. ज्याअर्थी अर्जदार यांनी कै. सोमनाथ जगन्नाथ बाविस्कर यांचा वारस दाखला मिळणेकरीता अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरीता पुढील चौ. दि. २३/०८/२०२३ ही निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वगैरे संबंधीतांना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश सो. क. स्तर कोर्ट नं. २ यांचे न्यायालयात उक्त निश्चित केलेल्या तारखेपर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे कामकाज पुर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही, दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण-धुळे
दिनांक :-१५/७/२०२३ आदेशावरुन

**कामगिरी कारकुन** (शिक्का) **अधिक्षक**
**मे. दिवाणी न्यायालय सो. कोर्ट नं.** **मे. दिवाणी न्यायालय सो. कोर्ट नं.**

# स्वरधारांनी चिंब झाली वर्षासहल

**नाशिक । प्रतिनिधी**




सध्या रिमझीम पावसाने सृष्टी बहरली असून हिरव्या रंगछटांनी निसर्ग सजतो आहे. हाच आनंद मनसोक्त लुटण्यासाठी रविवारी सरगम म्युझिक अकादमीतर्फे वर्षासहल आयोजित करण्यात आली. सर्वांनी पाऊसगाणी गाऊन धमाल केली. विविध खेळ रंगले. ५ ते ७० वयोगटातले सर्व ७५ विद्यार्थी स्वरधारांनी चिंब भिजले.

नंदकुमार देशपांडे संचलित सरगम म्युझिक अकादमीतर्फे रविवारी वर्षा सहल काढण्यात आली. त्र्यंबकरोडवरील वासाळी परिसरातील रिसॉर्टवर पोहोचल्यापासून सर्वांनी मनसोक्त आनंद लुटला. रिमझीम गीरे सावन, भिगा भिगा मौसम, सावन का महिना, सावन को आने दो या हिंदी गाण्यांसह सांग सांग भोलानाथ, घन घन माला नभी दाटल्या, निसर्गराजा ऐक सांगतो यासारखी लोकप्रिय मराठी पाऊसगीते सादर करण्यात आली. पावसाच्या भरलेल्या मेघांखाली रंगलेल्या या खुल्या मैफलीची सांगता सजन नयन नीत धार बरसती या भैरवीने झाली.

दुपारच्या सत्रात संगीत खुर्ची, अर्ध्या मिनिटात जास्तीतजास्त फुगे फुगवणे, गाण्यांच्या भेंडया या खेळांमध्ये छोट्यांपासून मोठ्यांपर्यंत सर्वजण उत्स्फूर्तपणे सहभागी झाले. रवींद्र मानकर यांनी वऱ्हाड निघालंय लंडनला या एकपात्री प्रयोगातला एक प्रसंग सादर करून टाळ्या मिळवल्या. छोट्यांनी व युवकांनी रेन डान्स केला. सर्वांचे सांगितिक गुरु नंदकुमार देशपांडे यांच्या हस्ते विजेत्यांना पारितोषिक वितरण करण्यात आले. मनाली गर्गे यांनी सूत्रसंचालन केले.

# विश्वनाथ भंदुरे रूपातील देवमाणूस हरपला : आहेर

**सातपूर ।** शरीरावर प्रेम असेल तर त्याने व्यायाम केला पाहिजे, दररोज सकाळी व सायंकाळी दोन कि.मी. चालल पाहिजे, मन शांत ठेवायचं असेल तर ध्यान केलं पाहिजे, बुध्दी शुध्द करायची असेल तर ग्रंथ वाचले पाहिजे, हाताची शोभा वाढवायची असेल तर दान केले पाहिजे, असा मोलाचा उपदेश व सल्ला देणारे सातपूरचे भूमिपुत्र महाराष्ट्र हौसिंग कॉलनीतील वारकरी, सप्तश्रृंगी देवी मंदिरासमोरचे मायको (बॉस)चे सेवा निवृत्त कर्मचारी हभपश्री विश्वनाथ सावळीराम भंदुरे यांचे ८४ व्या वर्षी निधन झाले. मितभाषी, प्रेमळ, शांत, म्हणजे विश्वाला कवेत घेणारे विश्वनाथ सावळीराम भंदुरे एक देवमाणुस होता. अशा भावना वारकरी महामंडळ नाशिक अध्यक्ष हभपश्री आण्णासाहेब महाराज आहेर हिसवळकर यांनी व्यक्त केल्या. यांचे पाठीमागे पत्नी, मुले, सुना, नात, नातू असा मोठा परिवार आहे. या निमित्ताने सात दिवस निवासस्थानीच गरुड पुराण कथा होणार आहे. कथा प्रवक्ते हभपश्री आण्णासाहेब महाराज आहेर हे वाचन करणार आहेत.



**ॲड.ज्योत्सना भ. पाटील**
**निशाणी नं.६**

## जाहिर नोटीस

**धुळे येथील मे. ३ रे सह दिवाणी न्यायाधीश सो. व.स्तर यांचे कोर्टात**
**दि. कि. अर्ज क्र. ८७४/२०२३**

विशाल पंढरीनाथ सैंदाणे .....**अर्जदार**
**विरुध्द**
**कोणीही नाही** ...**सामनेवाला**
कै. पंढरीनाथ भगवान सैंदाणे ...**(मयत)**

ज्याअर्थी अर्जदार नं. १ ) विशाल पंढरीनाथ सैंदाणे, २) विजय पंढरीनाथ सैंदाणे, ३) हेमंत पंढरीनाथ सैंदाणे (मयत), अ) वैशाली हेमंत सैंदाणे, ब) तेजश्री हेमंत सैंदाणे, क) पियूष हेमंत सैंदाणे, ड) दिपिका हेमंत सैंदाणे यांनी कै. पंढरीनाथ भगवान सैंदाणे यांचा मौजे - अ) महींदळे ता. जि. धुळे येथील नगर भूमापन क्र. ३६४९ क्षेत्र चौ.मी. ९२.००, ब) महींदळे ता. जि. धुळे येथील नगर भूमापन क्र.३६१७ क्षेत्र चौ.मी ५०.०० हया मिळकती कै. पंढरीनाथ भगवान सैंदाणे यांच्या नावे असुन सदरच्या मिळकतीस मालक सदरी नाव लावणेकामी अर्जदारांनी मे. न्यायालयात ते वारस असल्याचे ठरवुन मिळण्यासाठी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १९२७ चे कलम VIII प्रमाणे मा. न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर बाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची काहीएक तक्रार, हरकत असल्यास त्यांनी धुळे येथील मा. ३ रे सह दिवाणी न्यायाधिश सो. व.स्तर धुळे यांचे न्यायालयात दि. २८/०७/२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता स्वतः अगर वकिलामार्फत हजर राहून लेखी हरकत नोंदवावी. अन्यथा सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची काहीएक हरकत नाही, असे समजून वारस दाखला अर्जदार यांच्या लाभात देण्यात येईल.

सदर जाहीर नोटीस कोर्टाच्या सहीशिक्यानिशी प्रसिध्दीस दिली असे.

धुळे
दि. १५/७/२०२३ आदेशावरुन

**कामगिरी कारकुन** (शिक्का) **अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, धुळे** **दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, धुळे**

# स्वरभक्ती, सुरांचा अलवार नाद घेऊन सजली स्वरसकाळ

**दिलीप साळुंख । नाशिक**

सूर-तालाची मधुर बरसात घेऊन रम्य सकाळ, ख्याल गायकी, बंदीश, अभंग अशा विविध रूपांनी बरसत होती व रसिकांना अवीट, अभिजात आनंद देत होती. स्वरांतून निथळणारा आशय, शब्द साज लेऊन स्वराभिषेकच करत होता. 'सूर विश्वास' उपक्रमाचे अठ्ठावीसवे पुष्प रचना अमोल गाडगे यांनी गुंफले. गौरव तांबे(तबला), नाठे (संवादिनी) यांची त्यांना साथसंगत लाभली. तर कार्यक्रमाचे सूत्रसंचलन डॉ. स्मिता मालपुरे यांनी केले.

विश्वास ग्रुपचे कुटुंबप्रमुख विश्वास ठाकूर व रेडिओ विश्वास ९०.८ कम्युनिटी रेडिओच्या समन्वयक ऋचिता ठाकूर हे या उपक्रमाचे आयोजक असून संकल्पना विनायक रानडे यांची आहे. विश्वास गार्डन, येथे हा कार्यक्रम संपन्न झाला. उदयोन्मुख कलावंताच्या प्रयोगशीलेचा अविष्कार रसिकांना दर




महिन्याला अनुभवण्यास मिळत आहे.

रचना गाडगे यांनी मैफिलीची सुरुवात राग भैरवने केली,विलंबित ख्याल. शब्द होते 'बिराने देस जात हो' सुर आणि नादाची अपूर्व जाण, त्यातून स्वरांची हलकी नजाकत यातून ईश्वर भक्तीची ओढ,म्हणजे प्रेम याची जाणीव व्यक्त केली.त्यानंतर द्रुत एकताल बंदिश सादर केली, जागो ब्रिज राज कुवर , सुरांची अलगद साद आशयाचा बाज घेऊन किती मधुर अनुभूती देते याचा प्रत्यय होता.उत्तरोत्तर रंगत गेलेल्या मैफिलीत गुरू एक जगी त्राता,तसेच विश्वाचा विश्राम रे, बरसती अविरत श्रावण सरी अशा भक्ती रचनातून गायनाचा अनोखा आविष्कार पेश झाला.

यावेळी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.त्यात कमुनिटी रेडिओच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल रेडिओ विश्र्वासचे स्टेशन डायरेक्टर डॉ.हरी कुलकर्णी यांचा सन्मान सी एल कुलकर्णी यांचे हस्ते करण्यात आला तसेच छायाचित्रकार महारुद्र अष्टूरकर यांचा सन्मान डॉ श्री श क्षीरसागर यांचे हस्ते, अर्चना अमर भागवत यांच्या वाढदिवसा निमित्त गायिका रागिणी कामतीकर यांच्या हस्ते सन्मान केला.कलाकारांचा सन्मान हर्षल हणमंते, तुषार काशीकर यांचे हस्ते करण्यात आले.कार्यक्रमास मोठ्या संख्येने रसिक उपस्थित होते.

## न्यूज कॉलम

### संत नामदेव महाराज पुण्यतिथी साजरी

**धुळे ।** न्याहळोद येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिरात सतरा वर्षापासून संत नामदेव महाराज यांचे पुण्यतिथी साजरी होत असून, शिंपी समाज या कार्यक्रमाचे आयोजन करीत असते. योगेश महाराज वरझडीकर व जनार्दन महाराज यांच्या उपस्थितीत टाळ मृदंगाच्या गजरात पूर्ण गावातून संत नामदेव महाराज यांच्या पालखीची मिरवणूक काढून भजन गायन कार्यक्रम घेण्यात आले. व महाप्रसादाचा आयोजन देखील यावेळी करण्यात आला.

### देवपूर येथून तरुण बेपत्ता

**धुळे ।** शहराच्या देवपूर भागातील योगेश तुकाराम शेंडे (वय ३३, रा. साईबाबा मंगल कार्यालयाशेजारी, नकाणे रोड धुळे) हा १२ जुलैला घरून कुठेतरी निघून गेला. त्याचा नातेवाइकांकडे तसेच अन्यत्र तपास करूनही तो कुठे आढळला नाही. याबाबत तुकाराम मारोती शेंडे यांच्या माहितीवरून पश्चिम देवपूर पोलिस ठाण्यात बेपत्ता झाल्याची नोंद झाली.

# ग्रामीण भागात आपत्कालीन मदतीसाठी नवीन वाहने

**नाशिक । प्रतिनिधी**

डायल ११२ प्रकल्पाअंतर्गत नाशिक ग्रामीण पोलीस दलाला मिलेल्या एकूण २७ नवीन दुचाकी वाहनांना पोलीस महासंचालक (दहशतवाद विरोधी पथक महाराष्ट्र राज्य) सदानंद दाते यांनी हिरवा झेंडा दाखवून ही वाहने नागरिकांच्या सेवेसाठी उपलब्ध करून दिले. ही नवीन व सुसज्ज २७ दुचाकी वाहनांच्या उपलब्धतेमुळे नाशिक ग्रामीण पोलीसांना जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्थेचे प्रश्न हाताळण्यासोबतच तक्रारदारांचे कॉल स्वीकारून त्यावर शीघ्रतेने कारवाई करण्यासाठी मोठी मदत होणार आहे. तर डायल ११२ वर येणार्या कॉलला लागणारा प्रतिसाद वेळ देखील कमी होण्यास मोठी मदत होणार आहे.

नाशिक ग्रामीण पोलीस अंतर्गत एकूण ४० पोलीस स्टेशन, ८ उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालये, तर अपर पोलीस अधीक्षक नाशिक ग्रामीण व मालेगाव विभाग अशी एकूण ५० कार्यालये व इतर शाखा कार्यरत आहेत. सुमारे साडेतीन



हजार पोलीस अंमलदार व पोलीस अधिकारी कार्यरत असलेले जिल्हा ग्रामीण पोलीस दल सुमारे १५,००० चौरस किलोमीटर परिसरातील कायदा व सुव्यवस्थेची जबाबदारी सांभाळतो. राज्यातील नागरिकांना आपत्कालीन परिस्थितीत पोलीस मदत एकाच टोल फ्री क्रमांकावर उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने महाराष्ट्र आपत्कालीन प्रतिसाद यंत्रणा डायल ११२ प्रकल्प कार्यान्वित करण्यात आला आहे. या योजनेअंतर्गत नागरिकांनी केलेली तक्रार प्रायमरी कॉल सेंटर अथवा सेकंडरी कॉल सेंटर याव्दारे नाशिक ग्रामीणच्या मुख्य नियंत्रण कक्षात प्राप्त होते. तक्रार प्राप्त झाल्यानंतर ती शीघ्रतेने घटनास्थळापासून सर्वात जवळ असलेल्या वाहनास पुरविली जाते. कॉल करणार्या इसमाने मागितलेल्या मदतीनुसार असे वाहन तात्काळ घटनास्थळी रवाना होते व अडचणीत असलेल्या इसमास मदत पोहचविण्याचे काम करते. नाशिक ग्रामीण भागात सप्टेंबर २०१९ पासून डायल ११२ प्रकल्प कार्यान्वित झाला असून या प्रकल्पाअंतर्गत नागरिकांच्या तक्रारींची शीघ्रतेने दखल घेण्यासाठी या घटकास आणखी वाहनांची गरज होती. ही बाब लक्षात घेवून पोलीस महासंचालक कार्यालयाकडून एकूण १२ होंडा शाईन दुचाकी वाहने व जिल्हा नियोजन समितीकडून एकूण १५ बजाज पल्सर दुचाकी वाहने नाशिक ग्रामीण पोलीस दलाला मिळाले आहे. यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस अधीक्षक शहाजी उमाप यांनी केले. याप्रसंगी अपर पोलीस अधीक्षक माधुरी केदार-कांगणे, पोलीस उपअधीक्षक मुख्यालय नितीनकुमार गोकावे, पोलीस निरीक्षक मोटर परिवहन विभाग पंकज पवार, पोलीस निरीक्षक बिनतारी संदेश विभाग गोकुळ पवार, तसेच ग्रामीण पोलीस दलातील अधिकारी व अंमलदार उपस्थित होते.



# सुतार समाज सेवा मंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा व विद्यार्थी गुणगौरव कार्यक्रम संपन्न

**धुळे । प्रतिनिधी**

शहरातील मालेगाव रोडवरील श्री विश्वकर्मा भवन येथे सुतार समाजसेवा मंडळ यांची वार्षिक सर्वसाधारण सभा तसेच सन २०२२ व २३ या शैक्षणिक वर्षात दहावी बारावी व पदवीधर परीक्षेत शेकडा गुण ६० %व त्यापेक्षा अधिक गुणांची उत्तीर्ण झालेले विद्यार्थ्यांचा गुणगौरव कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

सुतार समाजाचे आराध्य दैवत भगवान श्री विश्वकर्मा यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. तसेच सोनी टीव्ही चे कार्यक्रमात महाराष्ट्रातून सुवर्णा विजय बागुल यांनी आपली पाककलेचे सादरीकरण केले म्हणून सुतार समाज सेवा मंडळ व सुहळे सुतार समाज मंडळ तसेच महिला मंडळ यांचे वतीने सत्कार करण्यात आला.

यावेळी अध्यक्ष ए बी वाघ, उपाध्यक्ष बटू बागुल, कार्याध्यक्ष सुरेश बागुल, सचिव दिगंबर वाडेकर, सहसचिव अशोक वाघ, खजिनदार विजय शेलार, बांधकाम समितीचे चेअरमन दीपक शेलार, शिक्षण समितीचे चेअरमन सुभाष वाडेकर, राजेंद्र मोरे, स्वप्निल बागुल, संतोष वाघ, देवेंद्र शेलार, सजन वाडेकर, छगन वाघ, चंद्रकांत शेलार, प्रकाश वाघ, शिवाजी बागुल, करुणा बोरसे, उज्वला बागुल, सविता बागुल, विमल वाघ, सुषमा बागुल, अलका शेलार, रेखा वाडेकर यांचे समवेत समाज बांधव तसेच महिला मंडळ मोठे संख्येने उपस्थित होते.

### शासकीय वसतिगृहासाठी मुलींची प्रवेशप्रक्रिया

**धुळे ।** ऑगस्टम सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत यंदाच्या शैक्षणिक वर्षातील मागासवर्गीय मुलींच्या शासकीय वसतीगृहासाठी (राजेश्वरी कॉलनी, देवपूर, धुळे) विद्यार्थीनींना संपर्काचे आवाहन आहे. धुळे शहरात शिक्षण घेणाऱ्या आठवीनंतरच्या विद्यार्थिनींना लाभ मिळेल. गुणवत्तेनुसार प्रवेशानंतर मोफत निवास, भोजन, नाश्ता, स्टेशनरी भत्ता, गणवेश भत्ता, सहल खर्च, तसेच दरमहा निर्वाह भत्ता देण्यात येईल. अनुसूचित जाती तसेच मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी गृहपालांशी (९९२२२६५६५७ / ०२५६२-२७२९७७) संपर्क साधावा. मोफत अर्ज उपलब्ध केले जातील.

# अजित पवारांच्या नेतृत्वाखालीच काम करणार पण शरद पवार नेते : माजी मंत्री डॉ. हेमंत देशमुख

**धुळे । प्रतिनिधी**

राज्यात यापूर्वीही काही राजकीय पक्षांमध्ये फूट पडली आहे. त्यामुळे राष्ट्रवादीतील फूट नवीन नाही. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यापासून दूर गेलो तर विकासापासून दूर जाऊ. आता उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली काम करणार असलो तरी आपले नेते खासदार शरद पवार हेच असल्याचे मत राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाचे नेते तथा माजी मंत्री डॉ. हेमंत देशमुख यांनी व्यक्त केले.

धुळे शहरातील कानुश्री मंगल कार्यालयात उपमुख्यमंत्री अजित पवार समर्थक गटाचा पहिला संवाद मेळावा झाला. त्या वेळी ते बोलत होते. या वेळी राष्ट्रवादीच्या अजित पवार गटाचे जिल्हाध्यक्ष सुरेश सोनवणे, जिल्हा परिषदेचे गटनेते पोपटराव सोनवणे, प्रदेश सरचिटणीस इर्शाद जहागीरदार, महिला आघाडीच्या शहराध्यक्षा सरोज कदम, प्रमोद साळुंखे, जया साळुंखे, डॉ. रवींद्र जगताप, समता परिषदेचे राजेश बागुल, महेंद्र शिरसाठ, मंगेश जगताप आदी उपस्थित होते. डॉ. हेमंत देशमुख म्हणाले की, यापूर्वीही राजकीय पक्षांमध्ये फूट पडली आहे. फूट पडली म्हणून जुन्या पक्षाचे ऋण विसरायचे नसते.

बैठकीत राजेंद्र चितोडकर यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या महानगर प्रमुखपदासाठी कैलास चौधरी यांच्या नावाचा ठराव मांडला.या ठरावाला उपस्थितांनी पाठिंबा दिला. याबाबत पक्षाच्या वरिष्ठांना माहिती द्यावी, असा आग्रह बैठकीत कार्यकर्त्यांनी धरला. ज्ञानेश्वर भामरे, मुकुंद बागुल, आशिष अहिरे, राजू चौधरी, मंगला मोरे, निखिल पाटील आदींसह पदाधिकारी उपस्थित होते.

### विद्याविहार विद्यालयात वृक्षाचे वाटप

**शहादा ।** विद्याविहार (ता. शहादा) येथील माध्यमिक विद्यालयात बेलवृक्षाचे वाटप करण्यात आले. यावेळी माधवी पाटील, कविता पाटील, हर्षा, पुष्पा पाटील, भावना पाटील, रंजु पाटील, हेमा पाटील यांनी आपल्या परस बागेत बेल वृक्षाचे रोप तयार केले होते. त्या रोपांचे या महिला समूहाच्या हस्ते वृक्ष संवर्धन प्रतिष्ठान चे प्रवर्तक, कार्यकर्ते प्रा. ज्ञानी कुलकर्णी यांना बेलाचे रोपे देण्यात आले. प्रा. ज्ञानी कुलकर्णी म्हणाले, वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन कार्यक्रमात महिलांनी खारीचा वाटा उचलला व वृक्षसंवर्धन प्रतिष्ठान च्या कार्याला सहकार्य केले म्हणून वृक्षसंवर्धन प्रेमी महिलांचे आभार मानले.

# प्राथ. शिक्षक पतपेढीचे चेअरमनपदी विनोद पाटील तर व्हा.चेअरमन पदी भाईदास पावरा

**धुळे । प्रतिनिधी**

देवपूरात अभियंता नगरामधील धुळे व नंदुरबार जिल्हा प्राथमिक शिक्षक सहकारी पतपेढीच्या चेअरमन व व्हा.चेअरमन पदाची निवडणूक पार पडली.तसेच निवडणूक अधिकारी भारती ठाकूर यांनी एका वर्षासाठी विनोद पाटील यांची चेअरमनपदी तर व्हा. चेअरमनपदी भाईदास पावरा यांची बिनविरोध निवड घोषित केली.

यावेळी नवनिर्वाचित चेअरमन विनोद पाटील, व्हा. चेअरमन भाईदास पावरा यांच्या सत्कार करताना गटनेते रवींद्र खैरनार, भैय्या शिंदे, शिवदास बैसाणे, पुकराज पाटील, प्रविण भदाणे, प्रकाश बच्छाव यांनी केला. नवनियुक्त संचालक रविंद्र बोरसे, बापु पारधी, भुपेंश वाघ, सुनील नहरे, राजेंद्र चौरे, चुनिलाल अहिरे, संदीप पवार, पुरुषोत्तम काळे, छोटु राजपूत, अनिल सोनवणे, संदीप नेरे, भरत तडवी, सुभाष पगारे, बाबुराव वसावे, दिपमाला पाटील, वैशाली पाटील यांच्या सत्कार करण्यात आला. उपस्थित सर्व प्राथमिक शिक्षक, पतपेढीचे सचिन, कर्मचारी वर्ग होते.



# युवा शक्ती फाउंडेशनतर्फे ५००० तरुणांना रोजगाराच्या संधी

**नाशिक । प्रतिनिधी**

युवा शक्ती फाउंडेशनच्या वतीने ५००० तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात आल्याची माहिती युवा शक्ती फाउंडेशनचे विभागीय व्यवस्थापक वैभव कुलकर्णी यांनी दिली. महाराष्ट्र शासन कौशल्य, रोजगार व उद्योजकता मंत्रालयाच्या विद्यमाने आयोजित 'सरकार आपल्या दारी' उपक्रमाअंतर्गत डोंगरे विद्यार्थी वसतिगृह मैदानावर




आयोजित पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्यात युवा शक्ती फाउंडेनच्या केंद्रात सहा हजार तीनशे बेरोजगारांनी आपली नावे नोंदवली. त्यातून पाच हजार तरुणांना रोजगाराच्या संधी प्राप्त झाल्याची माहिती युवा शक्ती फाउंडेशनचे उत्तर महाराष्ट्राचे झोनल व्यवस्थापक वैभव कुलकर्णी यांनी दिली. तसेच तसेच काल जागतिक युवा कौशल्य दिवसाच्या निमित्ताने १६०० विद्यार्थांना कौशल्याभिमुख प्रशिक्षणासाठी संधी निर्माण करून देण्यात आल्या.

या युवाशक्ती फाउंडेशनच्या वतीने आयोजित या उपक्रमास वायएसएफ स्किल इंडियाचे संचालक सतीश पवार यांचे विशेष सहकार्य लाभले. हा उपक्रम यशस्वी होण्यासाठी सागर पवार, विजय देसाई, हेमांगी पांडे, प्रवीण कुदळे, सचिन अहिरे यांचे विशेष सहकार्य लाभले.

### विजेच्या धक्क्याने एकाचा मृत्यू

**धुळे ।** विजेचा धक्का लागल्याने प्रौढाचा मृत्यू झाला. ज्ञानेश्वर नामदेवर मोरे (वय ५१, रा. दभाशी ता. शिंदखेडा) असे मृताचे नाव आहे. ९ जुलैला रात्री साडेआठच्या सुमारास दभाशी शिवारातील तापी नदी काठावरील जामफळ पंपींग हाऊसमध्ये काम सुरु असताना रवींद्र अहिरे, ज्ञानेश्वर मोरे हे मेन लाईनजवळ वायर ओढत होते. विजेचा धक्का लागल्याने ते बेशुद्ध पडले. त्यांना उपचारासाठी शिरपूर कुटीर रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले.

# हर हर महादेव विजय व्यायाम शाळेला भाजपाचे संघटक महामंत्री विजय चौधरी यांची भेट

**धुळे । प्रतिनिधी**

शहरातील हर हर महादेव विजय व्यायाम शाळेला भाजपाचे संघटक महामंत्री विजय चौधरी व खा.डॉ. सुभाष भामरे यांनी सदिच्छा भेट दिली.

यावेळी त्यांचे स्वागत करतांना भाजपाचे उपाध्यक्ष गजेंद्र अंपळकर, व्यायाम शाळेचे संस्थापक अध्यक्ष सतिष अंपळकर, माजी उप महापौर तथा नगरसेविका कल्याणी अंपळकर, पै. सुहास अंपळकर, व व्यायाम शाळेतील मल्ल उपस्थित होते.




# मराठा नवयुवक मंडळाच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा संपन्न

**शिंदखेडा । प्रतिनिधी**

मराठा समाज मंगल कार्यालयात गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव सोहळा आयोजित करण्यात आला होता. गुणगौरव सोहळ्याचे आयोजन सूर्यवंशी क्षत्रिय मराठा समाज नवयुवक मंडळ शिंदखेडा तर्फे करण्यात आले होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिंदखेडा येथील लोकप्रिय नेते रावसाहेब अनिल वानखेडे होते. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन करून करण्यात आली. त्यानंतर आलेल्या प्रमुख पाहुणे व मराठा समाज पंच मंडळ यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार नवयुवक मंडळाच्या वतीने करण्यात आला.

समाजातील दहावी बारावी उत्तीर्ण गुणवंत विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मान चिन्ह,शालोपयोगी वस्तू व सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. दहावी वर्गात शिंदखेडा येथील सकल मराठा समाजात प्रथम आलेली विद्यार्थिनी नंदनी प्रवीण मराठे चा विशेष सत्कार करण्यात आला.पुढे उत्तीर्ण विद्यार्थ्यांच्या वतीने कुमारी नंदनी प्रवीण मराठे ने मनोगत व्यक्त केले तर मराठा समाजातील माजी सरपंच जयदेव माणिक मराठे यांनी मार्गदर्शन स्वरूप मनोगत व्यक्त केले.ते म्हणाले की,समाजातील गुणवंतांच्या पाठीवर गौरव रुपी थाप टाकून नवयुवक मंडळ अतिशय महत्त्वाची भूमिका बजावत आहे.समाजात नव्याने उदयास आलेले नवयुवक मंडळ सामाजिक बांधिलकी जपून कार्य करत असल्याचे जयदेव मराठे म्हणाले. तर भूषण मराठे यांनी उत्साहपूर्ण मनोगत व्यक्त करताना सर्वांचे लक्ष वेधले.व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून भाजपा जिल्हा उपाध्यक्ष रावसाहेब अनिल वानखेडे,माजी नगराध्यक्षा मथुराबाई मराठे,माजी उपनगराध्यक्ष भाऊसाहेब भिला पाटील,भाजपा शहराध्यक्ष प्रवीण माळी,जयदेव मराठे सर माजी सरपंच वरुळ, समस्त सूर्यवंशी क्षत्रिय मराठा समाज पंच मंडळाचे चिंतामण नथू मराठे,अशोक रामदास मराठे, बापू कौतिक मराठे,नारायण दौलत मराठे,सह रामदास मराठे प्रभाकर मराठे, प्रेमराज मराठे,रामदास मराठे, भगवान मराठे,विनायक पवार,महेंद्र मराठे उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मराठा समाज नवयुवक मंडळाने परिश्रम घेतले,कार्यक्रमाचे सूत्रसंचालन यश मराठे तर प्रास्ताविक व आभार भूषण पवार यांनी केले.



शारदा शैक्षणिक व सामाजिक संस्था
Admission Open
विद्याधन महाविद्यालय, वलवाडी, धुळे
NAAC Accredited 'B' Grade – वडेल रोड, एमएसईबी जवळ, वलवाडी, धुळे
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापिठ जळगाव, कोड नं. 200111
B.Sc. | B.C.A | M.M.S./M.C.M.
डिप्लोमा उत्तीर्ण झालेल्यांना S.Y.B.Sc. ला प्रवेश SC/ST साठी मोफत
संपर्क: प्रा.ललिता निकम: 8862044791, प्रा.जागृती पाटील: 7887934365
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापिठ, नाशिक कोड नं. 5299A
B.A., B.C.A, B.Sc., M.A., M.C.A., M.B.A.
सर्व अभ्यासक्रमांना सत्यप्रतीवर (झेरॉक्स) प्रवेश मिळेल.
प्रा.हर्षल पाटील: 9421283577, श्री.नितेश पाटील: 9922116438, प्रा.भूषण पाटील: 7709100798
शासन मान्यताप्राप्त एम.एस.बी.टी.ई. मुंबई संलग्नीत कोड नं.2053
P.G.D.M.L.T. Advanced Diploma in Medical Laboratory Technology
पात्रता – बीएस्सी केमेस्ट्री, बॉटनी, झुऑलॉजी, मायक्रो बायोलॉजी/ बी.फार्म/बी.ए.एम.एस./बी.डी.एस./एम.बी.बी.एस.
संपर्क : प्राचार्य डॉ.के.बी.पाटील – 9422288518, सौ.शारदा पाटील – 9423496344
प्राचार्य डॉ.आर.बी.पवार: 9420375735,
प्रा.डॉ.योगेश बोरसे: 9423378936, श्री. हर्षल पाटील: 9421283577

CMYK

दैनिक

लक्ष महाराष्ट्र








# क्रेडाइ धुळे व गुड मॉर्निंग ग्रुपतर्फे स्टेडियम येथे वृक्षारोपण


















धुळे। क्रेडाइ

धुळे व गुड मॉर्निंग ग्रुप स्टेडियम धुळे यांच्या वतीने स्टेडियमवर वृक्षारोपणाचा कार्यक्रम महापौर प्रतिभा चौधरी यांच्या हस्ते संपन्न झाला. यावेळी सर्व मान्यवर पदाधिकारी नागरिक बंधू भगिनी उपस्थित होते. वातावरणात सातत्याने बदल होत आहे त्यामुळे पर्यावरणाचा समतोल ढासळतो आहे, पर्यावरणाचा प्रश्न सर्व जगाला भेडसावत आहे, पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वृक्षारोपण करणे किती गरजेचे आहे हे आपल्या सर्वांना माहिती आहे, यासाठी सर्व तरुणाईने पुढे येऊन पर्यावरण संरक्षण करणे महत्वाचे आहे. निसर्ग मानवाला सदैव निस्वार्थ भावनेने भरभरून प्रेम, स्नेह देत असतो त्या बदल्यात आपलेही हे कर्तव्य आहे की आपण निसर्गावर तेवढेच किंवा किंबहुना त्यापेक्षा जास्त प्रेम करावे व परमेश्वराचे आभार मानावे. विकास हा निश्चितच व्हायला हवा पण त्याचबरोबर वृक्षांचे व परमेश्वराने निसर्ग रुपी दिलेल्या अनमोल ठेव्याचेही रक्षण करणे अत्यंत गरजेचे झाले आहे. सहजीवनाची साखळी तोडण्याचे काम आज सर्वत्र सुरू आहे. एक वृक्ष हा मानवच नव्हे तर सूक्ष्म जीव, जंतू पशु, पक्षी या सर्वांना निस्वार्थ लाभ प्रदान करत असतो. काही ठिकाणी वृक्षारोपण केले तरीपण त्याचे संवर्धन, देखभाल होत नाही संबंधितांकडून लक्ष दिले जात नाही आणि त्यांच्या हलगर्जीपणामुळे लावलेले छोटे रोपटे वाळून जातात. सरकारने या गंभीर बाबींकडे लक्ष द्यावे ही विनंती. 'वसुधैव कुटुंबकम' याप्रमाणे मानवाने चालावे तेव्हाच समस्त सृष्टीचे निश्चितच कल्याण होईल. मोकळ्या जागेवर, सार्वजनिक ठिकाणी वृक्षारोपणासाठी नागरिकांना प्रोत्साहित करण्यात येत आहे.

संकलन : दिपक वाघ

CMYK

दैनिक
# लक्ष महाराष्ट्र





# आदिशक्ती धनाई-पुनाई माता मंदिर येथे भाजपा तर्फे टिफीन बैठक संपन्न














**सामोडे । भाजपतर्फे**

देशभर 'मोदी ९ महा जनसंपर्क अभियान' अत्यंत नियोजनबद्ध रित्या राबवले जात असून याद्वारे प्रत्येक समाज घटकांपर्यंत मोदी सरकारच्या विविध योजना पोहोचवून त्यावर जनतेची मतेही मागवली जात आहेत. टिफीन पार्टी चे आयोजन निसर्गाच्या सानिध्यात असलेल्या आदिशक्ती धनाई-पुनाई माता मंदिर येथे संपन्न झाली. या बैठकीला भारतीय जनता पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष राजेंद्र गावित यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच विधानसभा प्रमुख इंजि.मोहनराव सूर्यवंशी,प्रदेश कार्यकारणी सदस्य लिला सूर्यवंशी यांची उपस्थितीत संपन्न झाली. बैठकीत राजेंद्र गावित यांनी महाविजय २०२४ कसे यशस्वी करावे या साठी मार्गदर्शन केले व इंजि. मोहनराव सूर्यवंशी यांनी मोदी सरकारच्या योजनांची माहिती देऊन घर घर संपर्क अभियान राबवून कार्यकत्यांनी ९०९०९०२०२४ क्रमांक वर मिस्ड कॉल करण्यास सांगितले. बैठकीत प्रवीण देसले, सुनील माळी, कन्हैया लाल माळी, रावसाहेब खैरनार,अजय बच्छाव,डॉ. कन्हैयालाल साबळे, दत्तू बोरसे,राजेंद्र पाटील मुकेश पाटील, शिवचरण सूर्यवंशी,भागवंत देशमुख, अजय अहिरे,वसंत बागुल,ताराचंद चौधरी, मोतीलाल गांगुर्डे, जेपी सिंग, अरूण सुर्यवंशी, राजेंद्र सूर्यवंशी,अमोल ठाकरे आदीसह शक्ती केंद्र प्रमुख व बुथ प्रमुख उपस्थिती होते मनोज सोनवणे यांनी सूत्रसंचालन केले.

संकलन : दिलीप घरटे